ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत उप अभियान प्रकल्पासाठी निधी राखून ठेवण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
शासन शुध्दीपत्रक क्र. ग्रापापु-१००१/प्रक्र-३७७/पापु-०७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- २९ ऑगस्ट, २००२.

**वाचा :- शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि. क्र.ग्रापापु-१००१/प्रक्र-३७७/पापु-०७, दिनांक ४ आक्टोंबर, २००१.**

**प्रस्तावना :**

उपरोक्त शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्यास दरवर्षी प्राप्त होणा-या निधीपैकी २०% निधी उप अभियानाखालील योजना (उदा.उद्भवाची विश्वासार्हता वाढविणे, जलसंधारण व कृत्रिम पुर्नभरणाची कामे, पाणी संकलनाच्या योजना, पाण्याची प्रत रासायनिकदृष्ट्या प्रदुषित आहे अशा ठिकाणी सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे, इत्यादी) राबविण्यासाठी राखून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२. उप अभियानाखाली घ्यावयाच्या योजनांवर करावयाच्या खर्चासाठी केंद्र व राज्य शासनाच्या निधीचे प्रमाण ७५:२५ असे आहे.

**शुध्दीपत्रक :**

परिच्छेद २ मध्ये नमूद केलेले निधीचे प्रमाण लक्षात घेता संदर्भातील शासन निर्णयाच्या परिच्छेद ब) मध्ये नमूद केलेल्या "केंद्र शासनाकडून वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्यास प्राप्त होणा-या निधीच्या २०% रक्कमेच्या किमान ३३.५% एवढा निधी राज्य शासनाच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी दरवर्षी उपलब्ध होणा-या नियम व्ययामधून उप अभियाना प्रकल्पातील योजना राबविण्यासाठी राखून ठेवण्यात यावा" या वाक्यात **"३३.५%" ऐवजी "३३.३३%"** असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त,
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
महालेखापाल महाराष्ट्र,-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र-२,नागपूर (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषदा, (सर्व)

C:\ws०७\BHOSALE\cr-३७७-२००१.doc

मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधिक्षक अभियंता,तथा जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद,
संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७.